### प्रस्तावना

# नियोजन विभाग

माहितीचा अधिकार 2005 या कायद्याअन्वयें भारतीय प्रशासनाच्या इतिहासात एक नविन अध्याय जोडला गेला. नागरिकांच्या हितासाठी आपल्यासारख्या अवाढव्य लोकशाही राष्ट्राने उत्क्रांतीचे एक पाऊल टाकले आहे. ज्यात कारभारातील राज्य प्रणालीवर एक अदयरुत अंकुश ठेवण्यासाठी हा कायदा प्रचारात आणला आहे. माहितीचा अधिकार 2005 या कायद्यान्वये प्रशासन आणि संस्थांच्या धोरणे, नियम, कर्तव्ये आणि कामे आणि इतर तपशिल यांची सादयंत माहिती नागरिकाना उपलब्ध होण्यासाठी हा कायदा आहे. याचे गोषवारा शिर्षक खालीलप्रमाणे आहे.

## कायदा आणि न्याय मंत्रालय
## (वैधानिक विभाग)

नवी दिल्ली, दि.21 जून 2005/ जेष्ठ 31, 1927 (शके)

15 जून 2005 रोजी पार्लमेंटच्या या कायद्याला राष्ट्रपतींनी अधिमान्यता दिली आणि आता तो सर्वसामान्य माहितीसाठी प्रसिध्द झाला.

## माहितीचा अधिकार कायदा, 2005.
## (दि.2005 चा क्र.22)(15 जून 2005)

सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजात पारदर्शकता येण्यासाठी आणि जबाबदारीची जाणीव होण्यासाठी, तसेच केंद्रीय माहिती आयोग व राज्य माहिती आयोग यांच्या संविधानासाठी तसेच या माहितीशी निगडीत बाबी अथवा प्रासंगिकबाबींसाठी आणि जी माहिती सार्वजनिक प्राधिकरणाच्या अधिपत्याखाली येते ती माहिती सर्वसामान्य नागरिकांना खुल्या राजमार्गाने उपलब्ध होण्यासाठी हया कायद्याव्दारे वास्तवदर्शी राजवट म्हणून तरतूद केलेली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन विभागाव्दारे केली जाणारी कामे,धोरणे आखण्याची पध्दती, कामकाजाच्या पध्दती आणि दिल्या जाणा-या सेवा याबाबतीत नागरिकांत जागरुकता निर्माण होण्यासाठी पुस्तिका निर्देशित केली आहे.

नियोजन विभाग प्रत्यक्ष कसा आहे याचे आकलन कुठल्याही भारतीय नागरिकाला प्राधान्याने स्थानिक लोकांना व्हावे यासाठी ही पुस्तिका आहे.

**<u>या पुस्तिकेमध्ये अंतर्भूत असलेली माहिती.</u>**

संस्थेचा तपशिल, कामकाज आणि कर्तव्ये.

अधिका-यांचे आणि कर्मचा-यांचे अधिकार आणि कर्तव्ये.

नियम, नियमावली, सूचना, पुस्तिका, विविध श्रेणीतील विमुक्त्यांच्या कामकाजांचा अभिलेख.

दस्तऐवजांच्या विविध श्रेणी/वर्गवारी.

धोरणात्मक निर्णय घेतानाची पध्दती.

अधिकारी आणि कर्मचा-यांच्या नियमांचे पुस्तक आणि वेतनश्रेणी नियत अंदाजपत्रक, इतर उपयुक्त माहिती.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियोजन विभागाबाबत शक्य असेल तेवढी माहिती संकलित करण्याचा प्रयत्न केला आहे. नियोजन विभागाशी निगडीत असलेली प्रकरणे आणि बाबींबाबत अधिक माहितीचा या पुस्तिकेमध्ये समावेश नाही, परंतू, कुठलीही व्यक्ती सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांच्याशी त्यांच्या श्री.छत्रपती शिवाजी मार्केट, दुसरा मजल, पलटन रोड, मुंबई-400 001 या कार्यालयात माहितीचा अधिकार या कायद्याव्दारे संपर्क साधू शकतो.

माहिती मिळविण्याची पध्दती आणि शुल्क याबाबतीत पुस्तिकेमध्ये माहिती दिलेली आहे.

## पुस्तिकेची अनुक्रमणिका


1. संस्थेचा तपशिल (नियोजन विभाग) कामकाज आणि कर्तव्ये.

2. अधिकारी आणि कर्मचा-यांचे अधिकार आणि कर्तव्ये.

3. विभागाच्या नियंत्रणाखालील सूचना, नियम, नियमावली, पुस्तिका, आणि अभिलेख तसेच कर्मचा-यांच्या कामकाजाबाबत विमुक्तीचे धोरण.

4. सल्लागार अथवा लोकप्रतिनिधींकडून विद्यमान स्थितीतील कुठल्याही व्यवस्थेच्या तपशिलाच्या निर्णयाचे परिसुत्रीकरण करणे अथवा सदर तपशिल अमलात आणणे.

5. दस्तऐवजांच्या वर्गवारीचे विवरणपत्र.

6. समिती आणि इतर.

7. नियोजन विभागातील लोकांना माहिती देणा-या अधिका-यांचा तपशिल.

8. धोरणात्मक निर्णयासाठी अनुसरलेली पध्दती, पर्यवेक्षकांचे चॅनेल आणि जाबाबदा-यां अंतर्भूत धरुन.

9. अधिकारी आणि कर्मचारी यांच्या नियमांचे पुस्तक.

10. नियोजन विभागात काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी यांची वेतनश्रेणी.

11. नियत अंदाजपत्रक आणि बाजारात केल्या जाणा-या कामाचा तपशिल.

12. उपभोक्त्यांना दिलेले अर्थ सहाय्य.

13. नियोजन विभागाकडील उपभोक्तयांची यादी.

14. कार्याच्या विमुक्तीबाबत तयार केलेले नमुने.

15. इलेक्ट्रॉनिक अर्ज/माध्यम याव्दारे उपलब्ध असलेली माहिती.

16. लोकांसाठी माहिती उपलब्ध होण्यासाठी सुविधा.

17. इतर उपयुक्त माहिती.